नामनिर्देशनाने नियुक्ती,
सहाय्यक प्राध्यापक (विधी),
म.शि.से., गट-अ

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः नियुक्ती-२०१९/प्र.क्र.१८४/मशि-१
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०५ जुलै, २०१९

<u>वाचा :-</u> १) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. मलोआ-१०१४/प्र.क्र.९०/१४/आठ, दिनांक १२.१.२०१५.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१५/(१०८/२०१५)/मशि-१, दिनांक ११.९.२०१५.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१५/(१०८/२०१५)/मशि-१, दिनांक १२.७.२०१६.
४) श्री. आशुतोष कुंभकोणी, महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. एजी/१९८/२०१९, दिनांक ३.६.२०१९.

शासन निर्णय :-

शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्र. मलोआ-१०१४/प्र.क्र.९०/१४/आठ, दिनांक १२.१.२०१५ अन्वये शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथील शिक्षकीय पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून वगळण्यात आली आहेत. सदर पदे भरण्यासाठी दिनांक ११.९.२०१५ व दिनांक १२.७.२०१६ च्या शासन निर्णयांन्वये मा. महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली निवड मंडळ गठीत करण्यात आले आहे. सदर निवड मंडळाने केलेल्या शिफारशीस अनुसरुन खालील उमेदवारांची सहाय्यक प्राध्यापक (विधी), महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (महाविद्यालयीन शाखा) या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकान्यात ते ज्या दिनांकापासून त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकृत करतील त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीसाठी स्थानापन्न नियुक्ती करण्यात येत आहे.

क्र.	उमेदवारांचे नाव	वर्गवारी	नियुक्तीचा प्रवर्ग	पदस्थापनेचा तपशील
१	श्री. विक्रांत यादव	खुला	खुला	शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई
२	श्रीम. कृतिका टेंभूर्णीकर	खुला	खुला	शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई
३	श्रीम. श्वेता शिरस्कार	खुला (महिला)	खुला (महिला)	शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई
४	श्री. अमोल चव्हाण	विजा (अ)	विजा (अ)	शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई

२. उपरोक्त उमेदवारांची सहाय्यक प्राध्यापक (विधी), महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ (महाविद्यालयीन शाखा) या पदावर ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे:-

१) उपरोक्त उमेदवारांची वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगानुसार ५७,७००-१,०१,१००/- अशी राहील.
२) सदर वेतनश्रेणी व्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.
३) उपरोक्त उमेदवारांस प्रथम वेतनवाढ परिविक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.

४) उपरोक्त उमेदवारांचे परिविक्षा कालावधीतील काम किंवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाचे अथवा अनुरुप व असमाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यास अथवा सेवेतून कमी करण्यास पात्र ठरतील.

५) उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती सरळ सेवाप्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमाच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

६) उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांच्या चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणीचा अहवाल असामाधानकारक असल्याचे निर्दशनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता एक महिन्याची नोटीस देऊन समाप्त करण्यात येईल.

७) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील नियम ११ (१) अन्वये उपरोक्त उमेदवारांनी नियुक्तीच्या तारखेपासून त्यांची सहा महिन्याची सेवा पूर्ण होण्यापुर्वी आरोग्याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करणे बंधनकारक राहील.

८) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१ /३९,दि.७/८/२००० अन्वये शासनसेवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. उपरोक्त उमेदवारांनी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/३/२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहीत मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील.

९) उपरोक्त उमेदवाराचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा(वेतन) नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

१०) सदर उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर निर्देशिलेल्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत तात्काळ रुजू व्हावे. प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत काहीही कळविले नाही तर कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

११) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अंनियो-१००९/ प्र.क्र.३२/ सेवा-४, दि.१८/८/२००९ मधील तरतुदीनुसार दि. ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचा-याने त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तिवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दि. ०१ नोव्हेबर, २००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल आणि त्याला दि. ०१ नोव्हेबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नवीन पदावर नियुक्त करण्यात आले असेल तर अशा प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक:अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि.१२ जानेवारी, २००७ मधील (i) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबधीत शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन), नियम,१९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. दि.१८/८/२००९ च्या परिपत्रकात नमूद (i) ते (iv) येथील सर्व अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल अशा शासकीय कर्मचा-यास नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू ठरेल.

१२) उमेदवारांचे प्रचलित नियमानुसार सेवानिवृत्तीचे वय शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. ४८४/ १५/ विशि-१, दि.१२.०७.२०१६ मधील विहित अटींच्या अधीन राहून ६० राहील.

१३) उपरोक्त उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

१४) उपरोक्त उमेदवारांनी नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसूचना देणे अथवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक आहे.

३. हे आदेश प्राप्त होताच संबधीत उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल संबधीत प्राचार्यांकडे सादर करावा. प्राचार्यांनी याबाबतचा अहवाल संचालकांमार्फत शासनास सादर करावा.

४. सदर उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०६११२३१७९२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manisha Pravin Kini

Digitally signed by Manisha Pravin Kini
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=108cbdac08c7e940866a8fc97bfe7f861bf192ce9dd6b4d0924623149a51f9ed, cn=Manisha Pravin Kini
Date: 2019.07.06 11:26:56 +05'30'

(म. प्र. किणी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई
३. प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई
   वरील उमेदवाराच्या शैक्षणिक तसेच इतर मूळ प्रमाणपत्रांची तपासणी प्राचार्यांनी स्वत: करावी व सदर उमेदवारास हजर करुन घ्यावे व त्याबाबतचा अहवाल सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई व संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)-१, मुंबई.
५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
६. श्री. विक्रांत यादव, फ्लॅट नं. एफ-१, दिनदयाळ सोयायटी, भारती विद्यापीठ, पुणे ४११०४६.
७. श्रीम. कृतिका टेंभूर्णीकर, एफ-५, पार्श्वनाथ अपार्टमेंट, जोहरीवाडा, जैन मंदिराजवळ, औरंगाबाद-४३१००१.
८. श्रीम. श्वेता शिरस्कार, राजापेठ, रेल्वे फाटका समोर, झेंडा चौक, अमरावती
९. श्री. अमोल देव चव्हाण, फ्लॅट नं. १२, अक्षय विहार, गाडिया विहार बस स्टॉप जवळ, पृथ्वीराज नगर, औरंगाबाद - ४३१००५.
१०. निवड नस्ती.